ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# पुणे शहर वाहतुकीत पुणे परिवहन महामंडळाचे योगदान

**बाळासाहेब विठ्ठल कांगणे[1], प्राचार्य प्रा. डॉ. आदिनाथ मोरे[2]**

[1] *संशोधक विदयार्थी*

[2] *कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयलय, लासलगाव, नाशिक*

***Corresponding Author:* बाळासाहेब विठ्ठल कांगणे**

**DOI - 10.5281/zenodo.14875289**

**प्रास्ताविक:**

कोणत्याही देशाचा विकास हा तेथिल पायाभुत सुविधांवर अवलंबुन असतो. या पायाभुत सुविधांमध्ये वाहतुक या घटकास अनन्य साधारण महत्व आहे. वाहतुक व दळणवळण सर्वच देशांसाठी महत्वाचे असतात. वाहतुकीमुळे दळणवळण हे अधिक जलद गतीने होत असते. भारत हा एक खंडप्राय देश आहे. भारताचे एकुण क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चै. की. मी. आहे. भारताची लोकसंख्या सध्या १४१ कोटीपेक्षा जास्त आहे. कोणत्याही देशात प्रवासी वाहतुक आणि माल वाहतुकीच्या सोयी असणे हे प्रगत देशाचे लक्षण माणले जाते. भारतात रस्ते वाहतुकीचे जाळे ६६.७१ लाख कि.मी. अंतराचे आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग १,४६,१४५ कि.मी. राज्य महामार्ग १,७९,५५३ कि.मी. आणि इतर रस्ते ६३,४५,४०३ कि.मी. लांबीचे आहे. देशभरात सार्वजनिक व खाजगी वाहनांद्वारे वाहतुक केली जाते. महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक वाहतुकीस सुरवात १९३२ मध्ये झाली. १९४७ साली भारतातील ब्रिटिश राजवट संपुष्टात आली. त्यांनतर स्वतंत्र भारताच्या मुंबई प्रांतात १९४८ मध्ये बॉम्बे स्टेट रोड ट्रांसपार्ट कॉर्पोरेशची (बी.एस.आर.टी.सी.) स्थापना झाली. १ जुन १९४८ रोजी पुणे ते अहमदनगर मार्गावर पहिली एस.टी. बस धावली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाली. त्यांनतर महाराष्ट्रातील सार्वजनिक वाहतुकीसाठी बी.एस.आर.टी.सी. चे विलीनिकरण होऊन नवीन सार्वजनिक वाहतुकीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने कारभार सुरू केला. या महामंडळा अंतर्गत राज्यांतर्गत व राज्याबाहेर वाहतुक केली जाते. परंतु शहरी भागात देखिल लोकांना मोठया प्रमाणावर वाहतुक सुविधांची आवश्यकता होती. त्यासाठी अशा मोठया शहरांमध्ये देखिल सार्वजनिक वाहतुक सुरू करण्यात आली. यातील पुणे शहराचा विचार करता शहरामध्ये अनेक प्रकारची प्रवासी वाहतुक होत असली तरी सर्वात जास्त प्रवासी वाहतुक ही पुणे परिवहन महामंडळाद्वारेच होताना दिसुन येते. पुणे परिवहन महामंडळाचे पुणे शहरातील प्रवासी वाहतुकीसाठी भरीव असे योगदान आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. पुणे शहरातील पायाभुत सुविधांचा आढावा.

२. पुणे महानगर परिवहन महामंडळाचे योगदान अभ्यासणे.

३. पुणे महानगर परिवहन महामंडळाची कामगिरी अभ्यासणे.

**परिवहनाचा अर्थ:**

प्रत्येक राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत परिवहन साधनांना अनन्य साधारण महत्व असते. भारतातील कृषी, उदयोग, व्यापार इत्यादी क्षेत्रांचा विकास आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवुन आणण्यासाठी परिवहन मदत करीत असते. म्हणुनच परिवहन अर्थातच वाहतुक हे अर्थव्यवस्थेचे प्रमुख अंग बनले आहे. रस्ते वाहतुक, हवाई वाहतुक आणि जल वाहतुक ही वाहतुकीची प्रमुख साधने आहे.

परिवहन शब्दाला हिंदीमध्ये 'यातायात' तर इंग्रजीमध्ये Transport आणि मराठीमध्ये वाहतूक असे म्हणतात. या परिवहनाचे मानव संसाधन प्रक्रियेत खुप महत्वाचे स्थान आहे. मानवाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. परिवहन हा शब्द दोन शब्दांचा योग आहे.

'परि + वहन' = परिवहन

'परि' म्हणजे चांगल्या प्रकारे आणि 'वहन' म्हणजे घेऊन जाणे. आशा प्रकारे परिवहन या शब्दाचा अर्थ चांगल्या प्रकारे घेऊन जाणे असा होतो.

**पुणे शहरातील वाहतुक:**

पुणे शहर हे भारताच्या दख्खन पठारावरील महाराष्ट्र राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. २०११ च्या जनगणनेनुसार पुणे शहराची लोकसंख्या ३.१ दशलक्ष होती. पुणे हे जगातील नवव्या क्रमांकाचे सर्वात जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. पुणे शहरास सायकल शहर म्हणुनही ओळखले जाते. २०२० मध्ये पुणे शहरास शाश्वत वाहतुक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आशा शैक्षणिक व सांस्कृतिक वारसा असलेल्या पुणे शहराची वाहतुक पुढील मार्गांनी केली जाते.

**पुणे शहरातील रस्ते वाहतुक:**

पुणे शहर हे राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गांनी इतर भागांशी जोडलेले आहे. पुणे शहरामधुन NH ४८ NH ६५ आणि NH ६० हे राष्ट्रीय महामार्ग जात आहे. तर MSH २७ हा राज्य महामार्ग पुणे शहरातुन जातो. मुंबई पुणे एक्सप्रेसवे हा भारतातील पहिला महालेन असणारा महामार्ग २००२ मध्ये बांधण्यात आला. राष्ट्रीय महामार्ग NH ४८ मुळे पुणे शहराचे लक्षणीय असे अंतर कमी झाले आहे. पुणे शहराभोवती एक रिंगरोड देखिल आहे. यामुळे पुणे शहरातील नागरिक रस्ते वाहतुकीसाठी पुढील साधनांचा वापर करतात.

**१. सायकल:**

पुणे शहरास सायकल शहर असे देखिल म्हटले जाते. भारतातील सर्वात जास्त सायकल पुणे शहरामध्ये वापरल्या जातात. सन १९६० मध्ये जगातील पहिली सायकल रस्त्यावरून धावली. यानंतर जगातील सर्वच विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये सायकलचा वापर मोठया प्रमाणावर वाढला. आज हि सायकल हे सर्वात लोकप्रिय वैयक्तीक वाहतुकीचे साधन आहे. पदचारी मार्ग व वाहतुकीच्या मार्गाचा वापर सायकल चालवण्यासाठी केला जातो. दुध, फळे, भाजीपाला, पेपर विक्रेते मुखत्वे आपल्या व्यवसायात सायकलचा वापर करताना दिसुन येतात. पुणे शहरातील अनेक कामगार कामावर जाण्यासाठी आजही सायकलचा वापर करीत आहे. शहरातील शाळा, महाविदयालयांतील विद्यार्थी देखिल मोठया प्रमाणावर सायकलचा वापर करतात. सोयीस्कर व सुलभ परिवर्तनीय असे हे वाहतुकीचे साधन आहे.

**२. बस:**

शहर आणि उपनगरीय भागात सार्वजनिक वाहतुकीसाठी बसचा वापर होताना दिसुन येतो. यामध्ये प्रामुख्याने पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड द्वारे हि बस सेवा चालविली जाते. जलद प्रवासी वाहतुक करता यावी, यासाठी पुणे परिवहन महामंडळातर्फे रस्त्यांची स्वतंत्र लेन उपलब्ध करून इंद्रधनुष्य बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टम चालविली जाते. त्याचबरोबर इलेक्ट्रीक बसचा अवलंब करणारे पुणे परिवहन हे भारतातील पहिले शहर आहे. सध्या पुणे परिवहन महामंडळाचे पुणे आणि पिंपरी-चिंचवड मध्ये १३ डेपो कार्यरत आहे. या व्यतिरिक्त पुणे शहरांमध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे तीन डेपो छत्रपती शिवाजी नगर, पुणे स्टेशन व स्वारगेट येथे कार्यरत असुन या बसेसद्वारे देखिल सार्वजनिक वाहतुक केली जाते. त्याचबरोबर खाजगी कंपन्यांच्या बसेस देखिल पुणे शहरामध्ये चालविल्या जातात.

**३. इतर वाहतुकीची साधने:**

पुणे शहरामध्ये सध्या या सार्वजनिक साधना व्यतिरिक्त खाजगी वाहनांचा देखिल प्रवासी वाहतुकीसाठी मोठया प्रमाणावर वापर केला जातो. यामध्ये प्रामुख्याने रिक्षा, टॅक्सी, खाजगी बसेस, ओला, उबेर कंपन्यांचा गाडया अशा अनेक साधनांचा वापर प्रवासी वाहतुकीसाठी होताना दिसुन येतो. पुणे शहरामध्ये प्रवासी वाहतुकीसाठी सहजासहजी उपलब्ध होणारे खाजगी वाहन म्हणजे रिक्षा होय. खाजगी प्रवासी वाहतुकीमध्ये पुणे शहरामध्ये रिक्षांची संख्या सर्वाधिक आढळल्याचे दिसुन येते.

**पुणे शहरातील रेल्वे वाहतुक:**

पुणे शहरातील मुख्य रेल्वे स्थानक पुणे स्टेशन हे आहे. हे रेल्वे स्थानक मध्य रेल्वेच्या पुणे विभागाद्वारे चालविले जाते. शहरी भागामध्ये इतर अनेक रेल्वे स्थानक देखिल आहे. दैनंदिन एक्सप्रेस गाडया पुण्याला देशातील इतर शहरांशी जोडतात. पुणे शहराला उपनगरीय रेल्वे प्रणाली देखिल आहे. याद्वारे पुण्यातील उपनगरे आणि पुणे जिल्हयातील शेजारील गावांना जोडले जाते. पुण्याची उपनगरीय रेल्वे प्रामुख्याने दोन मार्गांवर चालते. पुणे स्टेशन ते लोणावळा आणि पुणे स्टेशन ते तळेगाव पुणे स्टेशन ते लोणावळा मार्गावर १८ गाडया चालविल्या जातात. तर पुणे स्टेशन ते तळेगाव मार्गांवर ५ गाडया चालविल्या जातात. आशाप्रकारे पुणे शहरातील रेल्वेद्वारे वाहतुक होत असते. पुणे जिल्हातील रेल्वे ट्रॅकची लांबी ३११ कि.मी. आहे. त्यापैकी सिंगल लाईन १६२ कि.मी. तर डब्बल लाईन १४९ कि.मी. आहे.

**पुणे मेट्रो:**

पुणे मेट्रो हि पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांना सेवा देणारी सध्याची जलद परिवहन प्रणाली आहे. पिंपरी चिंचवड स्वारगेट आणि वनाझ-रामवाडी या रेल्वे मार्गाची एकत्रिक लांबी ३१.२ कि.मी. आहे. त्याचबरोबर हिंझवडी शिवाजीनगर हा २३.३ कि.मी. चा मेट्रो मार्ग लवकरच पुर्णत्वावर येत आहे. इतरही मेट्रो मार्गांचे काम सध्या युध्द पातळीवर सुरू आहे. पुणे मेट्रोचे दिवाणी न्यायालय हे भारतातील सर्वात जास्त समुद्रसपाटी पासुन खोल असणारे स्थानक आहे. पुणे शहरातील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी पुणे महानगर पालिकेने मेट्रो हा चांगला प्रकल्प उपलब्ध करून दिला आहे.

**पुणे शहरातील हवाई वाहतुक:**

पुणे शहरामध्ये पुणे विमानतळ आणि छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ अशी दोन विमानतळे आहे. पुणे विमानतळ हे लोहगाव येथे असुन ते भारतीय विमानतळ प्राधिकरणाद्वारे चालविले जाते. देशातील सर्व प्रमुख शहरांतील देशांतर्गत उड्डाणे व आंतरराष्ट्रीय उड्डाने देखिल या विमानतळावरून होतात. छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भारतातील पुणे पुणे शहराला सेवा देण्यासाठी प्रस्तावित आहे. हे विमानतळ पुणे जिल्हातील पुरंदर तालुक्यामध्ये आहे. आशा प्रकारे पुणे शहरातील हवाई वाहतुक होत असते.

**पुणे परिवहन महामंडळ:**

पुणे परिवहन महामंडळाची स्थापना १९ ऑक्टोबर २००७ रोजी झाली. पुणे हे भारतातील सर्वात जलद वाढणाऱ्या शहरांपैकी एक शहर आहे. महाराष्ट्राची संस्कृतीक राजधानी आणि विदयेचे माहेरघर असा सांस्कृतिक वारसा या शहराला लाभला आहे. पुणे शहरातील पुणे परिवहन महामंडळ शहरातील समक्ष सार्वजनिक वाहतुक व्यवस्था असुन चैका-चैकातुन आधुनिकतेद्वारे प्रवास करणारी संस्था आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळातील दररोज ११ लाखांपेक्षा जास्त प्रवासी या सेवेद्वारे प्रवास करतात. महामंडळाचे सध्या १३ डेपो कार्यरत आहे. यामध्ये स्वारगेट, नरहर-तान्हाजी वाडी, कात्रज, भोसरी, हडपसर, शेवळवाडी, भेकराई, कोथरूड, मार्केट यार्ड, बाणेर, पिंपरी, निगडी, बालेवाडी या डेपोंचा समावेश होतो. या डेपो अंतर्गत शहरामध्ये सर्व सी. एन. जी. व

इलेक्ट्रॉनिक बसचा वापर केला जातो. सध्या पुणे शहरालगतच्या ग्रामिण भागात देखिल परिवहन महामंडळाने बस सेवा सुरू केली आहे. पुणे परिवहन महामंडळ अंतर्गत दररोज सकाळी ०५:३० वाजल्यापासुन ३७१ मार्गावर हि सेवा नियमितपणे चालविली जाते. पुणे परिवहन महामंडळाकडून नागरीकांना पुढील सुविधा दिल्या जातात.

१. प्रवासी दैनिक पास योजना
२. प्रवासी मासिक पास योजना
३. जेष्ठ नागरिक पास योजना
४. जेष्ठ नागरिक मासिक पास योजना
५. विदयार्थी मासिक पास योजना
६. विदयार्थी सहामाई पास योजना
७. पुणे व पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी पास योजना
८. विदयार्थी वार्षिक पास योजना
९. प्रवासांना आरामदायी प्रवास करण्यासाठी ऑलेक्ट्रा K9D & K7D या पांढऱ्या रंगाच्या परिवहन महामंडळाच्या वातानुकुलित बस
१०. पुणे शहरात मोठी वाहतुक कोंडीची समस्या आहे. यावर उपाय म्हणुन परिवहन महामंडळाकडून बी.आर.टी मार्गानी जलद वाहतुक सुविधा पुरविली जाते.
११. पुणे परिवहन महामंडळाच्या ॲप अंतर्गत माहिती व तिकिट काढण्यासाठी डिजिटल सुविधा.

**पुणे परिवहन महामंडळाचे योगदान:**

१. पुणे शहरातील लोकांना सदृढ वाहतुक व्यवस्था पुरविणे.
२. पुणे परिवहन महामंडळा अंतर्गत लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे.
३. पुणे शहरातील लोकांना स्वस्त वाहतुक सुविधा पुरविणे.
४. पुणे शहरातील नागरिकांना आरामदायी बस सुविधा पुरविणे.
५. पुणे महानगर पालिकेला शाश्वत आर्थिक उत्पन्न मिळवुन देणे.
६. पुणे शहरातील लोकांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यात मदत.
७. पुणे परिवहन महामंडळा अंतर्गत इलेक्ट्रॉनिक व सी.एन.जी. बस वापरामुळे पुणे शहरातील प्रदुषण कमी होण्यास मदत होत आहे.
८. प्रवासांच्या मागणीनुसार पुणे परिवहन महामंडळाची वाहतुक सुविधा उपलब्ध करून देणे.
९. पुण्य दर्शन योजनेअंतर्गत कमी खर्चात प्रवाशांना पुणे शहराचे दर्शन घडविणे.
१०. पुणे शहरातील शालेय विद्यार्थांसाठी पुणे परिवहन महामंडळ जिवणदायी ठरले आहे.
११. शहरातील अपंग व्यक्तीसाठी स्वतः व सुलभ वाहतुक व्यवस्था

अशा प्रकारे पुणे परिवहन महामंडळाची परिवहन सेवा हि शहराच्या कानाकोपऱ्यात पसरलेली वाहतुक व्यवस्था आहे. त्यामुळे पुणे शहराच्या विकासात परिवहन महामंडळाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

**संदर्भ:**

१. सरकार आर. के. (२०१५), भारत मे ग्रामिण सडक परिवहन परिदृष्य.
२. कुमार गैरव, (२०१५), पूर्वीत्तर मे परिवहन दशा और दिशा.
३. जाधव तुकाराम, (२०११), महाराष्ट्र वार्षिक युनिक ॲकेडमी, पुणे.
४. www.puneparivahan.com
५. https://pmpml.org